②

जा. क्र. माध्य. २[१४]/नुतनीकरण/पुणे/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 16 SEP 1995

प्रति,

मा. अवर सचिव,
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ३२.

विषय :- नुतनीकरणास मान्यता मिळणे बाबत.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
इंग्लिश मिडियम स्कूल, पुणे-५.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र समक्रमांक व दिनांक १२/८/९४.

महोदय,

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे-५ या संस्थेस शिवाजीनगर, पुणे-५ या ठिकाणी जून९२ पासून इंग्रजी माध्यमाची माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासन पत्र क्र. एसएसएन-१०९२/३१४१/माशि-१, दिनांक २४/१२/९२ अन्वये शासनाने परवानगी दिली आहे.

सदर संस्थेची इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा शिवाजीनगर, पुणे येथे सुरु आहे. संस्थेचा नैसर्गिक वाढीने सुरु होणारा इयत्ता ८वी चा वर्ग सन ९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून सुरु झालेला आहे. त्यामुळे परवानगी मिळूनही संस्थेने सन ९२-९३ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ८वी चा वर्ग सुरु केला नाही. त्यामुळे शाळा परवानगी बाबत शासनाने दिलेल्या आदेशाचे सन ९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरण करण्याबाबत संस्थेने विनंती केली होती. त्यानुसार संदर्भिय पत्रान्वये नुतनीकरणाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. तथापि याबाबत अद्याप शासनादेश प्राप्त झाले नाहीत.

सदर शाळेत सध्या इयत्ता ८वी ते १० वी चे वर्ग सुरु आहेत. त्यामुळे सदर शाळेस सन ९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरणाचे परवानगी देण्यास या कार्यालयाची शिफारस आहे.

आपला विश्वासू

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : माहितीस्तव

१) शिक्षण अधिकारी [माध्य.], जिल्हा परिषद, पुणे.
२) मुख्याध्यापक, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे इंग्रजी माध्यमिक विद्यालय शिवाजी नगर, पुणे - ५.

Headmistress
P. E. S. Modern High School
(Eng. Med.)Shivajinagar, Pune - 5.